<u>कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्ग</u>

# मुं.मे.रे.कॉ व एफ.डी.सी.एम करणार ९००० झाडांचे मियावाकी पद्धतीने रोपण

मुंबई, २४ फेब्रुवारी, २०२१ - मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे (मुं.मे.रे.कॉ) पर्यायी वृक्षारोपण अंतर्गत मियावाकी पद्धतीने वृक्षारोपण करण्यासाठी नुकताच मुंबई मेट्रो रेल कॉपोरेशन व फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉपोरेशन ऑफ महाराष्ट्र (एफडीसीएम) यांनी एक करार स्वाक्षरांकित केला आहे. या अंतर्गत मुंबई येथील गोरेगाव परिसरातील इनॉर्बिट मॉल जवळ सुमारे ३००० चौ मी भूखंडावर ९००० झाडांचे मियावाकी पद्धतीने रोपण केले जाणार आहे.

"या वृक्षारोपण मोहिमे अंतर्गत एफ.डी.सी.एमच्या साहाय्याने मियावाकी पद्धतीचा वापर करत अत्यल्प कालावधीत घनदाट वन निर्मिती केली जाणार आहे ही निश्चितच आनंदाची बाब आहे. .पर्यावरण संरक्षणासाठी आमच्या हरित धोरणा नुसार ही मोहीम राबविली जाणार आहे", असे मुं.मे.रे.कॉचे व्यवस्थापकीय संचालक श्री रणजीत सिंह देओल म्हणाले.

या मोहिमे अंतर्गत तीन महिन्यांच्या कालावधीत विविध स्थानिक प्रजाती जसे काथ, कडुलिंब, आवळा, बकुळ, सीता अशोक, चिंच, अर्जुन, बदाम इत्यादी ९००० वृक्षांचे रोपण करण्यात येणार आहे. एफ.डी.सी.एम पुढील दोन वर्ष या झाडांची मशागत देखील करेल.

यावेळी मुं.मे.रे.कॉ चे व्यवस्थापकीय संचालक श्री. रणजीत सिंह देओल, एफ.डी.सी.एम. नाशिक विभागाचे प्रादेशिक व्यवस्थापक, श्री. पी.टी. मोराणकर, मुं.मे.रे.कॉ चे कार्यकारी संचालक (नियोजन),श्री. आर. रमणा, एफ.डी.सी.एम चे विभागीय व्यवस्थापक,श्री. के. बी. भवर, मुं.मे.रे.कॉ चे सल्लागार (स्थापत्य), श्रीनिवास नंदरगीकर; वरिष्ठ उप महाव्यवस्थापक (पर्यावरण), श्री. अजय फुलमाळी; पर्यावरण वैज्ञानिक, श्री. संदीप सोहनी आणि एफ.डी.सी.एम. चे सहाय्यक व्यवस्थापक, श्री. एस. डी. गोरे उपस्थित होते. (समाप्त)

For further information please contact: -

Vaidehi More
9028543087
vaidehi.more@mmrcl.com

Niti Tamse
8369727364/9664215544
niti.tamse@mmrcl.com